**प्रेसनोट दिनांक १३/०४/२०१९**

**दत्तवाडी पोलीस ठाणे,पुणे**

**मा.न्यायालयात केसचेकामी हजर न राहणा-या अट्टल गुन्हेगारास दत्तवाडी पोलीसांनी केलेजेरबंद**

दत्तवाडी,स्वारगेट,खडक,वानवडी,चंदननगर,कोंढवा व डेक्कन पोलीस स्टेशन येथे एकुण १७ गुन्हे दाखल असेलेला अट्टल गुन्हेगार तसेचदत्तवाडी पोलीस ठाणे गु.र.नं.१९५/२०१५ भा.द.वि.कलम ३०७ व से.के.नं.१०७६/२०१६, मधील आरोपी नामे असिफ सलीम पटेल वय. ३२ वर्षे, रा. सर्वे नं. २१४, आंबिलओढा, दांडेकर पुल, पुणे हा नमुद गुन्हयाचे सुनावणीकामी मा. न्यायालयात हजर राहत नव्हता तसेच पोलीसांनाही त्याचे रहाते घरी दिले पत्यावर मिळुन येत नव्हता म्हणुन मा. न्यायालयाने त्याचेविरुध्द एन बी डब्ल्यु वॉरंट जारी केले होते. त्याअनुशंगाने त्याचा शोध घेत असताना दि. १०/०४/२०१९ रोजी दत्तवाडी पोलीस ठाणेचे पो. शि. सागर सुतकर व पो. ना. महेश गाढवे यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, आरोपी नामे असिफ सलीम पटेल हा निलायम टॉकीजजवळ प्लॅटीनम हॉटेलपाशी चहाचे टपरीजवळ थांबलेला आहे. अशी माहीती मिळाल्याने त्यांनी ती बातमी पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ यांना कळविली असता त्यांनी ती बातमी वरिष्ठ पोलीस निरिक्षक देविदास घेवारे यांना कळविली त्यावेळी त्यांनी आरोपीस तत्काळ ताब्यात घेणेबाबत कळविलेने पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ व स्टाफ असे तत्काळ सदर ठिकाणी जावुन आरोपीस सापळा रचुन पकडले असुन त्यास मा. न्यायालयात हजर केले आहे.

सदरची कारवाई मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री देविदास घेवारे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) राजेंद्र सहाणे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ पो ना महेश गाढवे, पो ना सोमेश्वर यादव, पो शि सागर सुतकर, पो शि शिवाजी क्षीरसागर, पो शि विकास कदम, पो शि राहुल ओलेकर, व पो शि अमोल लोहार यांनी केली आहे.

(देविदास घेवारे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पोलीस स्टेशन पुणे